# वसंतदादा पाटील महाविद्यालयाचे पूरग्रस्त भागात स्वच्छता अभियान

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

**जनतांडव वृत्तसेवा**

**तासगाव : प्रतिनिधी**

येथील पी. डी. व्ही. पी. महाविदयालयच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने पूरग्रस्त गाव तावदरवाडी (धनगाव) येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. अतिशय दुर्गंधी, घाण, चिखल असताना त्याची पर्वा न करता विद्यार्थ्यांनी गावातील ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडीच्या खोल्या, जि. प. शाळेची खोली, हनुमान मंदिर, इतर मंदिरे येथील पुराच्या पाण्यात भिजलेल्या वस्तू बाहेर काढून आतील व बाहेरील गाळ काढून पाण्याने स्वच्छ धुवून परिसर स्वच्छ केला.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या या स्वच्छता अभियानात १०५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. सदर अभियानासाठी प्राचार्य डॉ. मिलींद हुजरे यांनी मार्गदर्शन केले. संयोजन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. टी. के. बदामे, प्रा. डॉ. अमोल सोनवले, प्रा. डॉ. पी. बी. तेली, प्रा. आण्णासाहेब बागल तसेच सदस्य प्रा. मेघा पाटील, प्रा. डॉ. हाजी नदाफ यांनी केले.



**तावदरवाडी (ता. पलूस) येथील स्वच्छता अभियानात सहभागी वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी.**

या अभियानात विविध ग्रुपचे नेतृत्व जयदीप कांबळे, अजिंक्य माने, विवेक पाटील, रितूल शिंदे, विजय माळी, अजय पाटील, धीरज पाटील, गोमटेश अंकलखोपे, प्रिती भोरे, वैशाली जाधव इत्यादी विद्यार्थ्यांनी केले. या अभियानात बाहेरच्या महाविद्यालयातील प्रणय कांबळे, शितल पवार, रोहित खंडागळे हे स्वयंसेवक सहभागी झाले.